**भाग-अ**

| MHSO110037732019 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०९/११/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | ०९/११/२०२३ |
| | निकाल दिनांक | : | ०७/०८/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०२ ०८ २९ |

**माळशिरस येथील न्यायदंडाधिकारी वर्ग १ , न्यायालय क्र. ४ यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी- आर डी शिंदे)**

**-: न्यायनिर्णय :-**

(घोषित दिनांक:- ०७/०८/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र. ५८६/२०२३,** **निशानी क्र.**

**गु.र.नं. २७८/२०२३ वेळापूर पोलीस ठाणे ता. माळशिरस जि. सोलापूर**

| | |
|---|---|
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. आर पी सोनवणे |
| आरोपी | **१. पैगंबर रमजान अत्तार**, वय- ६७ वर्षे, व्यवसाय - मजुरी, राहणार - सुमीत्रा कॉलनी, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर<br><br>**२.रुबाब पैगंबर अत्तार**, वय- ३७ वर्षे, व्यवसाय - मजुरी, राहणार - सुमीत्रा कॉलनी, वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | श्री. एम एम जाधव |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | ०७/१०/२०२३ |
| दोषारोप दिनांक | ०९/११/२०२३ |
| दोषारोपपत्र ठेवल्याचा दिनांक | १७/०८/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०७/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ...... |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७/०८/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपींचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पैगंबर रमजान अत्तार | ... | ... | भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | निरंक | ०० |
| २ | रुबाब पैगंबर अत्तार | ... | ... | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | निरंक | ०० |

## भाग-क

## अभियोग पक्षाच्या साक्षीदाराची यादी /बचाव /न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | रमजान चॉंद तांबोळी | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | शमा रमजान तांबोळी | साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार ) |
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे /बचाव/ कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निशानी क्र. २३ व २४ | वैद्यकीय प्रमाणत्रे |
| २ | निशानी क्र. २५ | घटनास्थळ पंचनामा |

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ब-बचाव**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशानी**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल**

| अनु. क्र. | मुददेमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ११९/२०२३ | एक लोखंडी पाईप ३२ इंच लांबीची |
| २ | ११९/२०२३ | एम लोखंडी पाईप २१ इंच लांबीची |

**:: न्यायनिर्णय ::**

(घोषीत केल्याचा दिनांक : ०७/०८/२०२६)

प्रस्तुत आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ कायदयान्वये दंडनीय अपराधाकरिता खटला चालविण्यात आला.

**०२. अभियोग पक्षाची केस खालीलप्रमाणे,**

फिर्यादी रमजान तांबोळी यांनी अशी फिर्याद दिली की, दिनांक ०७.११. २०२३ रोजी दुपारी ०१.३० वाजण्याच्या सुमारास सुमित्रा कॉलनी, वेळापूर, ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर येथील फिर्यादीच्या राहत्या घरासमोर फिर्यादीव व आरोपीमध्ये घरातील किरकोळ कारणांवरुन भांडणे होवून आरोपीने लोखंडी पाईपने फिर्यादी व तिच्या पत्नीस शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरूध्द फिर्याद दिली आहे.

**०३.** प्रथम खबरीच्या अनुषंगाने आरोपींविरूध्द वेळापूर पोलिस ठाणे यांनी गुन्हा नोंदविला. पुढील तपास पोहेकॉ समाधान भगवान देशमुख यांनी केला. तपासी अधिका-यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरूध्द पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द निशाणी ०९ प्रमाणे दोषारोप ठेवला. आरोपीचे निवदेन निशाणी १० व ११ प्रमाणे नोंदविण्यात आले. त्यावर आरोपींनी गुन्हा नाकबुल करून, संपरिक्षेची मागणी केली. निशाणी १ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी संहिता प्रक्रिया चे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०५**. खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात त्यावर मी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे:-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व तिच्या पत्नीस | .... नाही. |

लोखंडी पाईने व काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ?

२) अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व तिच्या पत्नीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ? .... नाही.

३) अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी आपसात संगनमत करुन शांततेचा भंग व्हावा अन्यथा कोणतातरी गुन्हा घडावा या उद्देशाने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानित केले ? .... नाही.

४) अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? .... नाही.

५) अंतिम आदेश काय ? आरोपीस निर्दोष मुक्त केले.

**:: कारणमिमांसा ::**

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबत :-**

**०६.** मुद्दा क्रमांक १ ते ४ हे एकमेकांशी संलग्नित असल्यामुळे मी त्यांचे एकत्रित विवेचन करु इच्छिते.

**०७.** अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप शाबीत करण्याच्या हेतूने फिर्यादी साक्षीदार क्र ०१ रमजान तांबोळी यांची साक्ष नोंदविली. सदर फिर्यादी साक्षीदाराने आरोपी क्र १ हा त्याचा सासरा असल्याचे व त्याच्या पत्नीचे नाव शमा

तांबोळी असल्याचे कथन केले आहे. आरोपी रुबाब अत्तार हा त्याचा मेव्हाण आहे. दिनांक ०७.१०.२०२३ रोजी त्याचा आरोपीसोबत किरकोळ वाद झाला होता. त्याला किंवा त्याच्या पत्नीला आरोपींनी मारहाण केल्याची अशी कोणतीही घडली नसल्याचे त्याचे कथन आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सूचक प्रश्नांना सदर साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरलेली नाही.

**०८.** फिर्यादीच्या कथनाच्या पुष्टयर्थ अभियोगपक्षाने साक्षीदार क्र ०२ शमा तांबोळी यांना तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या जबाबात फिर्यादी तिचे पती असल्याचे व आरोपी नात्याने तिचे वडील व भाउ असल्याचे कथन केले आहे. दिनांक ०७.१०. २०२३ रोजी तिचे आरोपीसोबत किरकोळ वाद झाल्याचे व तिला किंवा तिच्या पतीला आरोपींनी मारहाण करुन जखमी केल्याची अशी कोणतीही घडली नसल्याचे तिचे कथन आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तर सूचक प्रश्नांना सदर साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरलेली नाही.

**०९.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, फिर्यादी व साक्षीदार क्र ०२ यांनी अभियोगपक्षास अनुसरुन साक्ष न दिल्याने त्यांचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरलेला नाही. तसेच सदर साक्षीदाराव्यतीरीक्त अभियोगपक्षाने एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविली नाही. अशा परिस्थीतीमध्ये आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व तिच्या पत्नीस लोखंडी पाईने व काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली असे गृहीत धरता येणार नाही. सदर बाब अभियोगपक्षाने ठोस पुराव्यानिशी शाबीत करणे अपेक्षीत होते. त्यामुळे फिर्यादी साक्षीदार यांची साक्ष अभियोगपक्षास फिर्याद शाबीत करणेकामी उपयुक्त ठरलेली नाही.

**१०.** आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व तिच्या पत्नीस लोखंडी पाईने व काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली तसेच आरोपींनी आपसात संगनमत करुन शांततेचा भंग व्हावा अन्यथा कोणतातरी गुन्हा घडावा या उद्देशाने फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानित केले व फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला हे अभियोगपक्ष संशयापलीकडे जावुन सिध्द करू शकला नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाच्या केसबाबत शंका निर्माण होते. आरोपी वरील आरोप निसंशयाच्या पलिकडे जावून सिध्द करण्याइतपत साक्षीपुरावा तसेच कागदपत्रे सिध्द करण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे. वरील सर्व विवेचनावरुन मुददा क्र. १ ते ४ यास मी नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत :-</u>**

**११.** अभियोगपक्ष अभिलेखावर सबळ पुरावा दाखल करण्यास अपयशी ठरला आहे. दाखल पुराव्यावरुन अभियोग पक्षास आरोपीवर ठेवण्यात आलेला गुन्हयाच्या आरोप संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत करता आला नाही. संशयाचा फायदा आरोपीला देणे क्रमप्राप्त आहे. सबब आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. वरील सर्व विवेचनास्तव निष्कर्षाअंती मुददा क्र. ५ बाबत खालील आदेश करीत आहे.

**<u>:: आदेश ::</u>**

(१) आरोपी क्र. १. पैगंबर रमजान अत्तार तसेच आरोपी क्र २. रुबाब पैगंबर अत्तार यांची भारतीय दंड विधानाचे दंडनिय कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन बंधपत्र रदद करण्यात येतो.

(३) जप्त प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक लोखंडी पाईप ३२ इंच लांबीची व एक लोखंडी पाईप २१ इंच लांबीची हे मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, ४३७-अ नुसार आरोपींनी रक्कम रुपये १५,०००/- प्रत्येकी वैयक्तिक मुचलका व त्याच रकमेचा जामीन दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.07 17:43:52 +0530

ठिकाण : माळशिरस
दिनांक : ०७/०८/२०२६

**(आर.डी.शिंदे)**
न्यायदंडाधिकारी,प्रथम वर्ग,
माळशिरस, (कोर्ट क्र. ४) जि.सोलापूर

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 07 / 08 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 07 / 08 / 2026. |